**माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी [गट-अ] या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्याबाबत.**

ICT Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 1404
Date: 21/07/2022

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२२/4355 /प्र.७**
**दिनांक :- 20 JUL 2022**

**संदर्भ-** कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, यांचे क्र.पदस्था/२०२१/प्र.क्र.१५२/गृनिभू दि.११/०७/२०२२ रोजीचे पत्र.

**आ दे श**

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, यांच्या दि.११.०७.२०२२ रोजीच्या संदर्भाधिन पत्रान्वये मान्यता दिल्यानुसार प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन, सिनिअर प्रोग्रामर (गट-ब) या संवर्गातील खालील नमूद अभियंत्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी [गट-अ]** या संवर्गात **एस-२०,रु.५६१००-१७७५००** या वेतनस्तरा मध्ये पूर्णपणे तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यालय | पदोन्नतीने पदस्थापनेचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.संदिप बोदेले, | माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी कक्ष/प्रा | माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी कक्ष/प्रा | श्रीमती. सविता अ बोडके यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |

२/- प्रशासकीय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

३/- संबंधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

४/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा [ वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

५/- संबंधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

६/- सदर आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

७/- पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रुजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच याबाबत शासन निर्णय दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल व पदोन्नतीसाठी पुढील २ वर्षे त्यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही. तिसऱ्या वर्षी त्यांचे नाव विभागीय पदोन्नती समितीसमक्ष सादर करण्यात येईल.

८/- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानूसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनूसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनूसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पूर्तता होत नसल्याचे आढळून आल्यास पदोन्नती आदेश रद्द करण्यात येतील.

**९/- उपरोक्त अधिकाऱ्यांनी दि.३१/३/२०२२ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

(राजकुमार सागर)
**सचिव / प्राधिकरण**

**प्रति,**
श्री.संदिप बोदेले, सिनिअर प्रोग्रामर/प्रा
**(मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान व अधिकरी यांचेमार्फत )**

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :</u>**

१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.

४) वित्त नियंत्रक/प्रा.

५) विधी सल्लागार/प्रा.

६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.

७) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.

८) मुख्य अधिकारी / मुं.झो.सु.मं., कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर मंडळ

९) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.

१०) सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ, मु.इ.दु.व पु.मंडळ

११) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान व अधिकारी/प्रा

१२) माहिती व संचार तंत्रज्ञान व अधिकारी (संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

१३) मुख्य लेखाधिकारी / मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ

१४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी/प्रा.

१५) संचालक, पी.डी.सी. पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर -**

**प्रत:** प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक

**प्रत,** प्रशासकीय अधिकारी -१,२/प्रा.

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना

प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना

अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

**प्रत**: प्रशासन-६,९,१०,११,१२,१३ /प्रा.